

नाव - हेमलता अरुण बोरसे.
पूर्वाश्रमीचे नाव - हेमलता हरीभाऊ खैरनार.

नमस्कार,

ग. ग. शाळेतील आठवणी या सदरांतर्गत मला माझ्या आठवणी माझ्या ग. ग. च्या मैत्रिणी आणि आमच्या लाडक्या शिक्षिकांपर्यंत पोहोचवण्याची ही सुवर्णसंधी मिळाली हे माझे भाग्यच आहे!

ग. ग. हायस्कूल चे नाव जरी घेतले तरी मन झरकन २५ वर्ष मागे जाते. सातपूर कॉलनीतील विद्यानिकेतन क्रमांक ८ मध्ये फक्त सातवीपर्यंतचे वर्ग असल्याने आठवीसाठी वडिलांनी मला नासिक मध्ये सीबीएस जवळच्या
ग. ग. हायस्कूलमध्ये प्रवेश घेऊन दिला. रोज बसने शाळेत जायचे, इतकी मोठी भव्य दगडी इमारत, आजूबाजूला मोठी झाडे, मागच्या बाजूला असलेले मैदान हे सर्व पाहून मी तर भारावूनच गेले. पण लवकरच या शाळेने, इथल्या सर्व शिक्षिकांनी आणि मुलींनी मला आपल्यात सामावून घेतले. इयत्ता आठवी मध्ये असताना गाजरे बाई आमच्या वर्गशिक्षिका होत्या. त्यांचे मोत्यासारखे सुंदर अक्षर आणि शास्त्र व गणित शिकवण्याची अतिशय सोपी, सुंदर पद्धत यामुळे त्या माझ्या अतिशय आवडत्या शिक्षिका बनल्या.पहिल्याच दिवशी त्यांनी मला वर्गप्रमुख बनवले आणि रोज फळ्यावर सुविचार वगैरे लिहिण्याची जबाबदारी दिली.

नंतर पुढे इयत्ता नववी अ मध्ये गेल्यानंतर मालपाठक बाई, जोशी बाई, वैद्य बाई, परांडेकर बाई, पांगारकर बाई, केंगे बाई या शिक्षिका होत्या. या सगळ्या जणी आपापला विषय इतका सुंदर शिकवत की आपोआपच आम्हाला त्या त्या विषयाची गोडी लागत असे.

जोशी बाईंची मराठी व्याकरण शिकवण्याची पद्धत, निबंध, ससंदर्भ स्पष्टीकरण इतके परफेक्ट असे कि तेव्हापासून लागलेली मराठीची गोडी आजतागायत टिकून आहे. मला तर आजही व्याकरणातील अलंकाराची उदाहरणे आठवतात जसे 'गणपत वाणी विडी पिताना….'

शास्त्र विषयाची गोडी लागली ती पांगारकर बाई मुळे! त्या रोज आम्हाला कोणातरी शास्त्रज्ञाची, संशोधकाची एखादी छोटीशी गोष्ट सांगायच्या. नुसती थेअरी नाही तर प्रॅक्टिकल वर त्यांचा नेहमी भर असायचा. घरून आम्हाला छोटे-छोटे विज्ञानाचे प्रकल्प करून आणायला सांगितले की आम्ही सगळ्या खुश!

गणित तर माझा आवडता विषय आणि त्यात वैद्य बाई यांच्यासारख्या शिक्षिका शिकवायला, मग काय दुधात साखर! फक्त शाळेचे गणितच नाही तर माझी गणिताची आवड आणि टॅलेंट पाहून शालाबाह्य गणित स्पर्धा परीक्षा जसे कापरेकर गणित स्पर्धा, टी म वी च्या गणित परीक्षा वगैरेंना बसण्यासाठी त्या नेहमी मला प्रोत्साहन द्यायच्या.

शुद्ध उच्चार कसे करावे हे संस्कृतच्या बाई म्हणजे परांडेकर बाई आणि गोरवाडकर बाईंनी शिकवले. त्यावेळी पाठ करून घेतलेले देव, वन, माला वगैरे शब्द, कितीतरी सुभाषिते, गीतेचे अध्याय आजही जसेच्या तसे पाठ आहेत. परांडेकर बाई नेहमी मला आंतरशालेय श्लोक पठण स्पर्धा, गीतापठण स्पर्धा, अनेक वक्तृत्व स्पर्धा यामध्ये मला भाग घेण्यास प्रोत्साहन देत आणि माझी तयारी सुद्धा करून घेत. त्यांनी सांगितलेली एक गोष्ट माझ्या कायम लक्षात राहिली. त्या म्हणायच्या ‘वक्तृत्वात बोलताना नेहमी बोलीभाषेचा वापर करावा’. त्यामुळेच मी वक्तृत्वात अनेक बक्षिसे मिळवू शकले.

ग.ग. शाळेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जे इथे फक्त पुस्तकी ज्ञानच नाही तर मुलींचा सर्वांगीण विकास कसा होईल याकडे लक्ष दिले जाई. निरनिराळे मैदानी खेळ, वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित करून मुलींमधील वक्तृत्व, गायन, वादन नृत्य, रांगोळी, चित्रकला वगैरे सर्व सुप्त गुणांना वाव दिला जात असे. मला आठवते दर वर्षी डिसेंबर महिना आला गॅदरिंगचे वारे वाहू लागत असे. मग अभ्यास कमी आणि वेगवेगळ्या स्पर्धांच्या प्रॅक्टीस मध्येच आम्ही जास्त वेळ घालवत असू. बरं स्पर्धांमध्येही दरवर्षी नावीन्य असे. कधी कथाकथन तर कधी असंबद्ध भाषण, कधी शीर्षक गीत गायन स्पर्धा तर कधी चक्क दूरदर्शनवरील जाहिरातींचे चे सादरीकरण करण्याची स्पर्धा! फॅन्सी ड्रिल, समूह नृत्य, समूह गायन वगैरे स्पर्धा तर असायच्याच. दरवर्षीच्या वक्तृत्व नाहीतर कथाकथन स्पर्धांमध्ये भाग घेऊन अनेक बक्षिसे केवळ बाईंनी दिलेल्या प्रोत्साहनामुळेच मी मिळवू शकले. त्यामुळेच माझ्यात सभाधीटपणा आला.

शाळेचं दरवर्षी छानसं मंत्रिमंडळही असायचं. त्यासाठी दरवर्षी रीतसर निवडणूक व्हायची. मला आठवतंय की, मी 'सांस्कृतिक मंत्री' म्हणून काम बघायचे आणि शाळेत होणाऱ्या कार्यक्रमांचं सूत्रसंचालन करण्याची जबाबदारी बाई माझ्याकडे द्यायच्या.

५ सप्टेंबरला शिक्षक दिन साजरा करायचो तेव्हा आम्ही साडी घालून छोट्या वर्गात मुलींना शिकवायचो तेव्हा आपल्यालाही बाईंसारखे छान शिकवता यायला पाहिजे ही जिद्द असायची. मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी वाटायचे की आपणही असंच शिक्षिका बनावं. मोठी झाल्यावर पुढील आयुष्यात खरोखरच मी देखील एक शिक्षिकाच बनले व अनेक विद्यार्थ्यांना मीदेखील ज्ञानदानाचे काम करू शकले हे माझं सौभाग्य.

खरंतर  ग. ग. शाळा आणि माझा संबंध फक्त तीन वर्षांचा पण या तीन वर्षांनी मला आयुष्यात खूप काही दिले ही तीन वर्ष माझ्या जीवनातील खूप महत्त्वाची आहेत या काळात मी जे काही शिकले, अनुभवले ते माझ्या जीवनाला कलाटणी देणारे ठरले माझ्यासाठी माझ्या शिक्षकांनी खूप काही केले वेळोवेळी त्यांनी केलेले मार्गदर्शन दिलेले प्रेम हे मी कधी कधीच विसरू शकणार नाही ही शाळा येथील सर्व शिक्षिका माझ्या सदैव स्मरणात राहतील.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते,

अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानाञ्जनशलाकया ।
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ॥

ही माहिती व हे सर्व साहित्य सर्वस्वी माझे आहे व ग. ग. संबंधी व्हाट्सअप ग्रुप, ब्लॉग, फेसबुक तसेच स्मरणिकेत प्रसिद्ध करण्यास मी स्वखुशीने संमती देत आहे.
धन्यवाद.

नाव - हेमलता हरिभाऊ खैरनार
सौ हेमलता अरुण बोरसे
मोबाईल नंबर - ८०८७८३८३६५.
ग. ग. बॅच - ९४.
पत्ता - B-१२, गुलमोहोर कॉलनी, पिंपळे गुरव, पुणे - ६१.